**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः संतोष राम माने,

वयः ५३ वर्षे, व्यवसायः नोकरी, पोलिस उपनिरीक्षक,

राहणारः गोरेगांव, ता. माणगांव, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांचे मार्फत शपथेवर सुरु**

०१. दिनांक २५/१०/२०१८ रोजी मी पोलिस स्टेशन, कोलाड येथे कार्यरत होतो. त्यावेळी खांब ग्रामपंचायतीचे हद्दीमध्ये अमीत पांडूरंग लहाने म्हणजेच आरोपी अवैधरीत्या दारु विक्री करीत असलेबाबत आमचे पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने कारवाई करण्याकरीता मी, पोलीस कर्मचारी श्री. तळवी, श्री. पाटील व दोन पंच मिळून मौजे खांब येथील आरोपीचे चायनीज दूकानाचे टपरीजवळ गेलो. त्यावेळी तेथे मोकळ्या जागेत तो प्लास्टीक पिशवी घेवून उभा असलेला आम्हाला दिसला. आम्ही पंचांसमक्ष त्याचे ताब्यातील प्लॅस्टीक पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये आम्हाला देशी दारु संत्रा गोल्ड कंपनीच्या १८० मिली मापाच्या २१ बॉटल मिळाल्या. त्या करीता आरोपीकडे कुठलाही परवाना नव्हता. आम्ही आरोपीचे नावाची खात्री केली. सदर दारुपैकी एक बॉटल सि.ए. परिक्षणाकरिता वेगळी सिलबंद करण्यात आली. तेथे मी पंचनामा तयार केला. त्यावर माझी व पंचांच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास यापुर्वी नि.क्र.१६ देण्यात आलेला आहे. त्यानंतर

आम्ही आरोपी व जप्त मुद्देमाल घेउन पोलिस स्टेशनला परत आलो. तेथे श्री. पाटील यांनी घटनेचे अनुषंगाने फिर्याद दिली. वरिष्ठांनी प्रस्तूत गुन्ह्याचा तपास माझेकडे सोपविला. मी गुन्ह्याचे तपासादरम्यान छापा कारवाईमध्ये सामील पोलीस कर्मचारी व खांब गावातील व्यक्ती यांची बयाणे नोंदविली. त्याचप्रमाणे सी.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेली बॉटल श्री. तळवी यांचे हस्ते तपासणीकरीता कलिना, मुंबई येथील प्रयोगशाळेमध्ये पत्र दि.२८/१०/२०१८ अन्वये पाठविली. सदर पत्रावर माझी, श्री. तळवी प्रभारी अधिकारी व प्रयोगशाळेचे लिपीकाची सही असून मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येतो. त्या अनुषंगाने रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. गुन्हयाचे तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळाल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. (अर्ज नि.क्र.२१ वरील आदेशाप्रमाणे आरोपीला आज न्यायालयात हजर राहण्यापासून सूट देण्यात आली.)

सरतपासणी पूर्ण.

**उलटतपासणी आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी. सानप यांचेमार्फत.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी लोकांचा वावर असतो, मी घटनास्थळाचे आजूबाजूला राहणा–या व्यक्तींची बयाणे नोंदविली नाही, जप्त मुद्देमाल कारखान्यामध्ये तयार करण्यात आला होता, नमुद परिस्थितीमध्ये सदर वस्तूवर बॅच क्रमांक, निर्मीती व अंतिम तारीख व इतर अनुषंगीक तपशिल लिहिलेला असतो, पंचनाम्यामध्ये जप्त बॉटलचा बॅच क्रमांक नमुद नाही.

०३. सी.ए. परिक्षणाकरीता बॉटल पाठवितेवेळी त्यावर आमचे पोलीस स्टेशनची मोहोर उमटविण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, खांब नाक्यावर ३–४ चायनिज दुकाने व हॉटेल्स आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना कार्यक्षमता दर्शवण्याकरीता प्रोहिबीशन रेड कराव्या लागतात. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला आरोपीकडे जप्त मुद्देमाल मिळाला नव्हता, केवळ पोलीसांची कार्यक्षमता दर्शविण्याकरीता आम्ही तो आरोपीच्या ताब्यात मिळाल्याचे दाखविले.

०४. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/१०/२०१८ रोजी मी पोलिस स्टेशन, कोलाड येथे कार्यरत नव्हतो, त्यावेळी खांब ग्रामपंचायतीचे हद्दीमध्ये अमीत पांडूरंग लहाने म्हणजेच आरोपी अवैधरीत्या दारु विक्री करीत असलेबाबत आमचे पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त झाली नव्हती, त्या अनुषंगाने कारवाई करण्याकरीता मी, पोलीस कर्मचारी श्री. तळवी, श्री. पाटील व दोन पंच मिळून मौजे खांब येथील आरोपीचे चायनीज दूकानाचे टपरीजवळ गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे मोकळ्या जागेत आरोपी प्लास्टीक पिशवी घेवून उभा असलेला आम्हाला दिसला नाही, आम्ही पंचांसमक्ष त्याचे ताब्यातील प्लॅस्टीक पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये आम्हाला देशी दारु संत्रा गोल्ड कंपनीच्या १८० मिली मापाच्या २१ बॉटल मिळाल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्या करीता आरोपीकडे परवाना होता, आम्ही आरोपीचे नावाची खात्री केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दारुपैकी एक बॉटल सि.ए. परिक्षणाकरिता वेगळी सिलबंद करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे मी पंचनामा तयार केला नाही, त्यानंतर आम्ही आरोपी व जप्त मुद्देमाल घेउन पोलिस

स्टेशनला परत आलो नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, तेथे श्री. पाटील यांनी घटनेचे अनुषंगाने फिर्याद दिली नाही, वरिष्ठांनी प्रस्तूत गुन्ह्याचा तपास माझेकडे सोपविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गुन्ह्याचे तपासादरम्यान छापा कारवाईमध्ये सामील पोलीस कर्मचारी व खांब गावातील व्यक्ती यांची बयाणे नोंदविली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सी.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेली बॉटल श्री. तळवी यांचे हस्ते तपासणीकरीता कलिना, मुंबई येथील प्रयोगशाळेमध्ये पत्र दि.३०/१०/२०१८ अन्वये पाठविली नव्हती, त्या अनुषंगाने रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयाचे तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळाल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले नाही.

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.09.18 16:09:55 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.१८.०९.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.